दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । सोमवार
१३.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २७७
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955








# पालवनच्या आडरानात नेत्यांनी रेल्वे लुटली

## नगरला ५० रुपये भाडे तर स्थानकावर जाण्यासाठी २०० लागणार,बार्शीनाक्यावर थांबा तरी द्या

बीड, (प्रतिनिधी):-२६ जानेवारी पूर्वीच बीड रेल्वेसत्ताक होणार असल्याची लगबग दिसत असताना रेल्वेच्या प्रवासाला जेवढे लागणार नाहीत तेवढे रिक्षा भाडे स्टेशनला पोहोचायला लागणार आहेत.जर नगर भाडे ५० रुपये असेल तर बीड शहरातून बीड रेल्वे स्थानकावर पोहोचायला २०० रुपये लागतील. बार्शीनाका भागातील प्रस्तावित आणि बांधकाम होऊन पडलेले स्टेशन केवळ मावेजासाठी पालवण परिसरात घेऊन जाणाऱ्या तत्कालीन राजकीय लोकांनी स्वतच्या बगल बच्चासाठी रेल्वेचे आणि जनतेच्या खिशावर संयुक्तीक दरोडा टाकला असेच म्हणावे लागेल.



### बार्शीनाका थांबा खासदारांच्या खांद्यावर

बीडच्या सामान्य जनतेला पालवण स्टेशन परवडत नाही, प्रवासी आणि माल वाहून नेताना भुर्दंड बसणार आहे. आपण यावर काम करणार असून बार्शीनाका रेल्वेस्थानक किमान थांबा मिळावा हि मागणी खुर्शीद आलम व कृती समितीने केली असून रेल्वे प्रशासनाकडून थांबा मंजूर करून घेऊच असा शब्द खासदार बजरंग सोनवणे यांनी दिला आहे.



### क्षीरसागर-मुंडेकडून स्थानक पळविण्यास कौल?

बार्शीनाका भागात १ रुपयाला जी जमीन मिळालेली होती ती पालवणकडे १० रुपयाला रेल्वेने घेतली. बार्शीनाका भागात रेल्वे स्थानक मंजूर झाले, ५० एक्कर जमीन संपादित केली, इमारती बांधण्यात आल्या. प्रकाश आंबेडकर नगर भागात इथे स्लम भाग असल्याचे कारण पुढे करत प्रवासी ▶▶पान २ वर

### पटरीवर रक्ताचे पाट वाहतील-खुर्शीद आलम

आम्ही गेली २० वर्षे बार्शीनाका भागात रेल्वे स्थानक असावे यासाठी भांडत आहोत, रेल्वेच्या आणि सामान्य लोकांच्या दृष्टीने सोयीचे होते. मात्र दुर्दैवाने अर्थकारण व राजकारण आडवे आले आणि आमचे स्थानक गेले. यातून लाखो लोकांचे नुकसान झाले, आता किमान बार्शीनाका येथे थांबा द्या नाहीतर आम्ही पटरीवर प्राणांतिक आंदोलन करू उद्या रक्त सांडले तरी चालेल असे खुर्शीद आलम यांनी म्हटले आहे.

# सरपंचाच्या मृत्यूने बीड हादरलं!

## पण हा अपघात की घातपात? मोठी माहिती आली समोर

बीड, (प्रतिनिधी) :- बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्याप्रकरण राज्यभर गाजतेय. या प्रकरणात नवनवीन खुलासे समोर येतायत. त्यात आता ही घटना ताजी असतानाच आज आणखीण एका सरपंचाचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. राखेची वाहतूक करणाऱ्या एका टिप्परने सरपंचाच्या दुचाकीला धडक दिली होती. या धडकेत सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर अभिमन्यू क्षीरसागर यांच्यासोबत खरंच अपघात झाला आहे की घातपात झालाय? असा संशय व्यक्त करण्यात आला होता. अशात आता या



प्रकरणाबाबत गावकऱ्यांनी मोठी माहिती दिली आहे. बीडच्या परळी तालुक्यातील सौंदाना येथील सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांच्या दुचाकीला राखेची वाहतूक करणाऱ्या वाहनाने धडक दिली होती. या अपघातात क्षीरसागर यांचा जागीच मृत्यू झाला होता. या प्रकरणात परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात चालक भोजराज देवरवकर ( राहणार वडार कॉलनी परळी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात केला आहे. तसेच या अपघाताला कारणीभूत असलेल्या चालकाला तत्काळ अटक करावी अशी मागणी ग्रामस्थ व नातेवाईकांनी केली होती. दरम्यान या प्रकरणात देशमुख हत्या प्रकरणानंतर ▶▶पान २ वर

### राखेचे टीप्पर अजून सूरूच

काल रात्री नऊ वाजून २० मिनिटांनी ही घटना घडली आहे. बोगस आणि अवैध राखेची लूट परळी भागात चालू आहे. याचा करिश्मा बघा. रात्री झालेली घटना घातपात की अपघात याचा शोध अजून लागायचा आहे. परळी विभागाची चर्चा महाराष्ट्रात सूरू असून राखेचे टीप्पर बंद नाहीत.या अवैध व्यवसायांना परळीचे पोलिस, थर्मल पॉवरचे अधिकारी आणि कर्मचारी जबाबदार असल्याचा आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला.

# 'त्या' लाडक्या बहिणींचे पैसे आता दंडासहित वसूल होणार?

मुंबई, (वृत्तसेवा):-ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील महिलांना आर्थिक मदत व्हावी या उद्देशानं लाडकी बहिण योजना सुरु करण्यात आली आहे. आतापर्यंत या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांच्या खात्यामध्ये सहा हाप्ते जमा करण्यात आले आहेत. दर महिन्याला महिलांच्या बँक खात्यामध्ये दीड हजार रुपये जमा करण्यात येतात. आमचं सरकार पुन्हा आलं तर आम्ही महिलांच्या खात्यामध्ये २१०० रुपये जमा करू अशी घोषणा महायुतीकडून करण्यात आली होती. आता पुन्हा एकदा राज्यात महायुतीचं सरकार आलं आहे, त्यामुळे २१०० रुपये कधीपासून जमा होणार याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. मात्र त्याचपूर्वी एक मोठी बातमी समोर आली आहे. ज्या महिला योजनेच्या निकषात बसत नाही, त्यांची




जर तक्रार आली तर त्यांच्या अर्जाची पुन्हा पडताळणी होणार असं या आधीच मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे. ज्यामध्ये त्यांनी असं सांगितलं, की ज्या महिलांचं उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, ज्या महिलांकडे चार चाकी गाडी आहे. ज्या महिलांचं आधार कार्डला वेगळं नाव आणि ▶▶पान २ वर

# १ ते ९ फेब्रुवारी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा

## शिवसेना जिल्हाप्रमुख जगताप,मुळूक,गलधर यांच्या हस्ते चंपावती महोत्सवाचे पोस्टर विमोचन!

बीड, (प्रतिनिधी) :-बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रातील मानबिंदू ठरलेला चंपावती महोत्सव बाल कलाकारांनी आपल्या अद्भुत कलाविष्काराने एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवला आहे. गत दोन वर्षांच्या अफाट यशानंतर जिल्ह्याभरातील अनेक शाळांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, पालक बालकलाकार आणि कलाप्रेमींच्या खास आग्रहास्तव याहिवर्षी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १ फेब्रुवारी २०२४ ते दि. ८ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान आठ दिवासीय चंपावती ▶▶पान २ वर



# वाल्मिक कराडवर मोक्का लावा, ३०२ च्या गुन्ह्यात आरोपी करा



## मस्साजोगच्या ग्रामस्थांसह धनंजय देशमुख टॉवरवर चढून आंदोलन करणार

बीड, (प्रतिनिधी) :- सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात तपास यंत्रणेने आतापर्यंत आठ आरोपींना अटक केली. तसेच मोक्का अंतर्गत कारवाई केली. मात्र यात खंडणीतील आरोपी वाल्मीक कराड याच्यावर मोक्काची कारवाई केली जावी. तसेच ३०२ च्या गुन्ह्यात आरोपी करावं या मागणीसाठी धनंजय देशमुख यांच्यासह मस्साजोग ग्रामस्थांकडून मोबाईल टॉवरवर चढून आंदोलन केले जाणार आहे. संतोष देशमुख यांचा भाऊ धनंजय देशमुख हे उद्या आंदोलन करणार आहेत. वाल्मीक कराड यांच्यावर अद्याप मोका अंतर्गत कारवाई झाली नाही त्या मागणीसाठी आंदोलन करण्यात येणार आहे. अद्याप वाल्मीक कराडवर हत्याप्रकरणी कारवाई का नाही ? असा सवाल धनंजय देशमुख यांनी सरकारला केलाय. धनंजय देशमुख म्हणाले, वाल्मीक कराड यांच्यावर मोका अंतर्गत कारवाई केली नाही. ३०२ मध्ये आरोपी केले पाहिजे. माझ्या कुटुंबाला माहिती दिली जात नाही. आम्हाला दूर ▶▶पान २ वर

# प्रियांका मीन्स बीड...

## डू यु अंडरस्टँड,मुंबईकर्स इट्स खो



### क्रॉसलाईन

आमचा अविनाश साबळे देशाची शान, आमचे पैलवान आशिया गाजवणार, आता आमची लेक देशाच्या संघाची कर्णधार. बीड म्हणजे उपेक्षित नाही रे पिंट्या, सलोख्याची रील दीड मिनिटाची आणि पेटवणारे शो दीड तासाचे ▶▶पान २ वर

### मिडीयामुळे आनंदग्रामचा दवाखाना गेला

पाली नजीक दत्ताभाऊ आणि संध्याताई यांचे आनंदग्राम जग प्रसिद्ध आहे. डोंगरावर सेवेचा हिमालय आहे. एचआयव्हीग्रस्त लेकरांच्या अनेक पिढ्या त्यांनी जगवल्या आणि उभ्या केल्या. मंझरी चौफुलीवर आजवर २८ जीव अपघातात गेली, ११ गावांना आरोग्य सेवा देणारे एक सुसज्ज हॉस्पिटल ते रोज नजीक करणार होते. त्यांनी त्यासाठी दोन गुंठे जागा तयार केली मुंबई ▶▶पान २ वर




# विक्रमी आणि वेताळ




माणसाला विक्रमांचे कोण वेड. हे वेड एवढे टोकाचे की आपण पृथ्वीची शक्य तेवढी नासधूस करण्यातही मागे राहण्यास तयार नाही. त्यातही आपण 'अग्रेसर' ठरल्याचे नुकतेच अधिकृतरीत्या जाहीर झाले. आजवरचा सर्वाधिक तप्त दिवस, सर्वाधिक तप्त महिना, सर्वांत उष्ण दशक असे नवनवे विक्रम प्रस्थापित करून झाले. आता 'कोपर्निकस क्लायमेट चेंज सर्व्हिस'ने नुकत्याच सादर केलेल्या अहवालानुसार २०२४ हे आजवरचे सर्वांत तप्त वर्ष ठरल्याचे सिद्ध झाले आहे. आणखीही एक विक्रम नोंदविण्यात आपण 'यशस्वी' झालो आहोत- तो म्हणजे औद्योगिकी करणापूर्वीच्या तापमानापेक्षा १.५ अंश सेल्सियस अधिक सरासरी तापमान नोंदविण्याचा. हा उंबरठा न ओलांडण्याचे उद्दिष्ट आजवर विविध पर्यावरण परिषदांत अधोरेखित केले गेले होते. मात्र पुढे जाण्याच्या स्पर्धेत नेमके 'कोणत्या क्षेत्रात' याचाही विसर पडून आपण हा उंबरठादेखील ओलांडला. आता आणखीही एक जळजळीत वास्तव पुढे आले आहे. ते म्हणजे स्पर्धेत सर्वांत पुढे असलेलेही यापुढे झळांपासून सुरक्षित राहू शकणार नाहीत. दोनच दिवसांपूर्वी अमेरिकेतल्या हॉलीवूड टेकड्यांवर लागलेला भीषण वणवा आणि त्यामुळे तेथील धनाढ्यांना तिसऱ्या जगातल्या खेड्यातील पूर किंवा भूकंपग्रस्तांप्रमाणे सुरक्षित स्थळी करावे लागलेले स्थलांतर हे त्याचेच द्योतक. त्यामुळे हा प्रश्न आता खऱ्या अर्थाने जागतिक झाला आहे. मागचे वर्ष एल-निनोचे होते, त्याचा प्रभाव तर पडणारच होता, अशी सबब देऊन आजवरच्या पातकातून मुक्त होता येणार नाही. एल-निनो आणि ला-निना हा निसर्गक्रमाचाच भाग आहे. त्याला दोष देऊन हात झटकणे आणि जगभरात ज्या उष्णतेच्या लाटा, वणवे, पूर, ढगफुटी, दरड कोसळणे अशा घटना घडल्या त्यांचे खापर एकट्या एल-निनोवर फोडणे हा शुद्ध अप्रामाणिकपणाच ठरेल. स्वत:ला या ग्रहावरील सर्वाधिक बुद्धिमान प्राणी म्हणवणाऱ्या माणसानेच या ग्रहाची सर्वाधिक हानी केली, हे वास्तव नाकारता येणारच नाही. गतवर्षाची सुरुवातच झाली ती चक्रीवादळाने. वर्षाच्या पहिल्याच दिवशी मादागास्करमध्ये अलवारो वादळ धडकले. ज्या व्हेनेझुएलात एकेकाळी सहा हिमनद्या होत्या, तो देश याच वर्षात आधुनिक काळात सर्व हिमनद्या नाहीशा झालेला देश ठरला. आपल्या शेजारच्या बांगलादेशाला पुराचा जबरदस्त फटका बसला. जगात अशी स्थिती असताना भारताच्या नंदनवनातील गुलमर्ग भर जानेवारीत बर्फाविना उघडे पडले होते. अशाने पर्यटकांचा तर हिरमोड होतोच, पण प्रचंड फटका बसतो, तो तेथील शेतीला, जलसाठ्यांना. साहजिकच उदरनिर्वाहापुढे दुहेरी प्रश्नचिन्ह उभे राहते. राजधानी नवी दिल्लीची पुरामुळे कोंडी झाली. एरवी उत्तर भारताला सतावणाऱ्या उष्णतेच्या लाटांनी ईशान्येकडील राज्यांनाही आपल्या तीव्रतेची झलक दाखविली. वायनाडमध्ये कोसळलेली दरड, हिमाचल प्रदेशातील ढगफुटी, बंगळुरूला भेडसावणारी तीव्र पाणीटंचाई या सर्व निव्वळ नैसर्गिक घटना होत्या, असे म्हणता येणार नाही. अल्पावधीत सरासरीच्या कित्येक पट अधिक पाऊस कोसळणे आणि मग आठवडेच्या आठवडे कोरडे जाणे, नदीकिनाऱ्यांवर अतिक्रमण करून उभारलेले 'रिव्हर व्ह्यू'चे इमले धडाधड कोसळणे, जोशीमठमध्ये जमिनीला तडे जाणे, एरवी गुलाबी भासणारी थंडी धुरकट-करडी होत जाणे हे नक्कीच केवळ नैसर्गिक नाही. पृथ्वीची आज जी घुसमट सुरू आहे त्यात विकासाच्या स्पर्धेत अग्रस्थानी असलेले सर्वांत मोठे गुन्हेगार आहेत. पण विरोधाभास असा की या ग्रहाचे पर्यावरण सांभाळण्याची धुरा वाहणाऱ्या जागतिक परिषदांचे म्होरकेही हेच असतात. परिणामी याच सर्वांत तप्त वर्षात झालेल्या 'कॉप २९ परिषदे'त हवामान बदलांच्या परिणामांची भरपाई म्हणून प्रगत देशांनी गरीब देशांची केवळ ३०० अब्ज डॉलर्सवर बोळवण केली. बरे, परिषद झाली कुठे तर तेल विहिरींचे आगर असलेल्या अझरबैजानमध्ये. अशा परिषदेकडून काय अपेक्षा ठेवणार? तापमानवाढीचे दुष्परिणाम गरीब किंवा विकसनशील देशांनाच सर्वाधिक भोगावे लागतात, असा आजवरचा समज होता. भारतासारख्या देशात जिथे उन्हा-तान्हात प्रदीर्घ काळ अंगमेहनतीची कामे करणाऱ्यांचे, बेघरांचे प्रमाण प्रचंड मोठे असते, गावखेड्यात- वाड्यावस्त्यांत पाण्यासाठी तासन्तास विहिरी, डबकी धुंडाळत फिरावे लागते अशा देशात वाढत्या तापमानाची झळ अधिक लागणारच, पण आता केवळ विकासात मागे पडलेल्या देशांनीच काळजी करावी आणि पुढारलेल्यांनी काही डॉलर्स भिरकावून बिनदिक्कत, सुखेनैव वाटचाल सुरू ठेवावी अशीही सोय राहिलेली नाही. अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये हॉलीवूड हिल्सवर लागलेले वणवे हे श्रीमंतीने सुस्तावलेल्यांचे डोळे उघडवणारे आहेत. एखाद्या गरीब देशाच्या किनाऱ्यावरील खेड्याला चक्रीवादळाच्या इशाऱ्यामुळे जसे रातोरात घर-दार मागेच सोडून जीव मुठीत धरून तात्पुरते विस्थापित व्हावे लागते, तीच वेळ आज या अतिश्रीमंतीचे प्रतीक ठरलेल्या टेकड्यांवरच्या विलासी रहिवाशांवर आली आहे. वणव्यात २५ हजार एकर जागा भस्मसात झाली आणि एक लाख लोकांना विस्थापित व्हावे लागले. काही जणांना प्राण गमावावा लागला. निसर्गापुढे सारे शहाणपण, सारी मुजोरी गळून पडते ती अशी. आपली कथा तर आणखी वेगळी. अर्थव्यवस्थेतल्या तिसऱ्या क्रमांकासाठी आपण एवढे उतावीळ की त्यासाठी डोंगर पोखरण्यास, जंगले उद्ध्वस्त करण्यास सदैव उत्सुकच. तसे नसते तर उत्तरेच्या लडाखवासीयांना ऊर्जा प्रकल्पांविरोधात आणि सहाव्या अनुसूचीतील समावेशासाठी दिल्ली गाठावी लागली नसती. दक्षिणेतल्या निकोबारमधील स्थानिक जमातींना आपल्या पूर्वजांच्या जमिनी आंतरराष्ट्रीय व्यापारी बंदरासाठी गिळंकृत केल्या जाण्याची, तेथील जैवविविधता बेचिराख होण्याची चिंता भेडसावली नसती. हसदेवमधल्या रहिवाशांना कोळसा खाणींविरोधात आवाज उठवावा लागला नसता आणि महत्त्वाकांक्षी चार-धाम प्रकल्पातील सिल्कियारा बोगद्यात अडकून मजुरांचे जीव टांगणीला लागले नसते. विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन असो वा 'सौरघर'सारख्या योजना, आपल्या पर्यावरणविषयक आस्थेच्या आणि समजेच्या मर्यादा वारंवार स्पष्ट होत आल्या आहेत. कोळसा जाळून, जल-वायू-मृदेचे प्रदूषण करून वीज तयार करायची आणि त्यावर चालणाऱ्या वाहनांना पर्यावरणस्नेही म्हणायचे. पण सर्वांना सोयीस्कर ठरेल अशी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याची तसदी घ्यायची नाही. सौर-ऊर्जा एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत वाहून न्यायची आणि पॅनल्स व बॅटरीच्या विल्हेवाटीचा गंभीर प्रश्न निर्माण करून ठेवायचा, अशी आपल्या धोरणांची अवस्था. अशा स्थितीत पर्यावरण रक्षणाला हातभार लावण्याची अपेक्षा ठेवणेच निरर्थक. प्रगत असोत वा मागास प्रत्येकाचीच वाटचाल उद्या उगवणारच नाही, पुढच्या पिढीला जल-वायू-जमीन-अन्नाची गरजच उरणार नाही किंवा अन्य कोणत्या तरी ग्रहावर आधीच पृथ्वीवासीयांची सोय करण्यात आली असावी, अशा आत्मविश्वासाने सुरू आहे. २०२४ हे सर्वांत तप्त वर्ष ठरल्यानंतर २०२५ हे तुलनेने कमी उष्ण वर्ष ठरेल, असे अंदाज व्यक्त करण्यात येत होते, मात्र ज्या 'कोपर्निकस'ने सर्वांत तप्त वर्षाची नोंद केली, त्याच संस्थेने जानेवारीचे पहिले सहा दिवस आजवरची 'नववर्षाची सर्वांत उष्ण सुरुवात' ठरल्याचेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे २०२४ कडे केवळ अपवाद म्हणून दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. आपण सारेच निसर्गाला पायदळी तुडवण्याचे नवनवे विक्रम प्रस्थापित करत नवे 'विक्रमा'दित्य ठरू पाहत आहोत. पण मानगुटीवर बसलेला तापमानवाढीचा वेताळ दिवसागणिक अधिकाधिक क्लिष्ट प्रश्न विचारणार, हे निश्चित. राजा विक्रमादित्याकडे वेताळाच्या प्रश्नांची उत्तरे होती, म्हणून तो वाचला. आपले काय?

# विरोधकांना बसायला एकही जागा ठेवू नका

## पंचायत ते संसद भाजपच असली पाहिजे-अमित शाह

मुंबई, (वृत्तसेवा):- विधानसभा निवडणुकीत आपण उत्तम पद्धतीने काम केले. ज्यांनी बाळासाहेबांचे विचार सोडले त्यांना त्यांची जागा दाखवली आणि ज्यांनी कायम विश्वासघाताचे राजकारण केले, त्यांचे राजकारण २० फूट जमिनीत गाडले. आता आपले पुढचे लक्ष्य आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जिंकण्याचे आहे. येत्या जिल्हा परिषद महापालिका निवडणुकीत विरोधकांना बसायला एकही जागा ठेवू नका. पंचायत ते संसद भाजपच असली पाहिजे, असे आक्रमक भाषण करून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड ऊर्जा भरली. तब्बल तीन दशकानंतर महाराष्ट्रात कोणत्याही एका पक्षाला १३० हून अधिक जागा जिंकल्या आल्या आहेत, अर्थात तो पक्ष आहे भाजप विधानसभेत ऐतिहासिक यश मिळाल्यानंतर कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि त्यांच्या खांद्यावर पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची जबाबदारी देण्यासाठी भाजपचे शिर्डीत अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात मुंबईसह नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक आदी महत्त्वाच्या महापालिका आणि त्याबरोबरच जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुका जिंकण्याचा निर्धार भाजपने केला आहे. अमित शाह यांनी भाषणात विधानसभेच्या विजयाबद्दल कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. विकासाचे वर्तुळ तेव्हाच पूर्ण होते जेव्हा पंचायत ते संसद एकाच पक्षाचे सरकार असते. आता विधानसभेत आणि संसदेत भाजप आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजपचेच उमेदवार निवडून आले पाहिजेत. विरोधकांना बसायला एकही जागा ठेवू नका, पंचायत ते संसद भाजपच असली पाहिजे, असे अमित शाह म्हणाले. पक्षाची दीड कोटी सदस्य नोंदणी लवकरात लवकर करून आगामी निवडणुकीसाठी पुन्हा जनतेच्या दारोदारी जाऊन सरकारच्या योजना पोहोचवा, असे निर्देश अमित शाह यांनी दिले. आपल्याशी धोका करण्याची पुन्हा कुणाची हिम्मत होऊ नये, यासाठी आपल्याला पक्षाचे संघटन मजबूत करण्याची आवश्यकता असल्याचे शाह कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले. दुसरीकडे लोकसभा निवडणुकीत पिछेहाट झाल्यानंतर भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर टीका करणे टाळले होते. परंतु विधानसभेत ऐतिहासिक यश मिळाल्यानंतर शिर्डी होत असलेल्या अधिवेशनात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर



कडाडून टीका केली. शरद पवार यांनी कायमच दगाफटक्याचे राजकारण केले. त्यांचे राजकारण २० फूट जमिनीत गाडण्याचे काम राज्यातील जनतेने केले तसेच बाळासाहेबांची विचारधारा सोडून गद्दारी करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना जनतेने दागा दाखवली, अशा शब्दात अमित शाह यांनी दोन्ही नेत्यांवर तोफ डागली.

# टीम इंडियाची चॅम्पियन्स ट्रॉफीत धमाकेदार सुरुवात,पाकिस्तानला १०९ धावांनी लोळवलं

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):-भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाने टी २० चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ या स्पर्धेत विजयी सुरुवात केली आहे. टीम इंडियाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा धुव्वा उडवत धमाकेदाक विजय मिळवला आहे. टीम इंडियाने पाकिस्तानला विजयासाठी १६१ धावांचं आव्हान दिलं होतं. मात्र पाकिस्तानने टीम इंडियाच्या भेदक माऱ्यासमोर गुडघे टेकले. भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानला अवघ्या ५१ धावांवर गुंडाळलं. टीम इंडियाने यासह १०९ धावांनी जबरदस्त विजय मिळवला. टीम इंडियाने सामन्यातील पहिल्या डावात बॅटिंग केली. टीम इंडियाने १९ ओव्हरमध्ये ४ विकेट्स गमावून १६० धावा केल्या. टीम इंडियासाठी निखील मनहास याने ४७ चेंडूत ५९ धावांची खेळी केली. तर कर्णधार विक्रांत केणी याने ३७ धावांची स्फोटक खेळी केली होती. विक्रांतने २३ बॉलमध्ये ही खेळी केली. प्रत्युत्तरात पाकिस्तानची घसरगुंडी झाली. पाकिस्तानचं ५१ धावांवर पॅकअप झालं. पाकिस्तानसाठी अब्दुला एजाज याने सर्वाधिक ११ धावा केल्या. टीम इंडियासाठी जितेंद्र वीएन



याने अवघ्या ५ धावा देत २ विकेट्स घेतल्या. भारताने अशाप्रकारे पहिला विजय मिळवला. ✻ १२ जानेवारीपासून सुरुवात: दरम्यान दिव्यांग चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेला रविवार १२ जानेवारीपासून सुरुवात झाली आहे. या स्पर्धेच्या यजमानपदाचा मान हा श्रीलंकेकडे आहे. टीम इंडिया या स्पर्धेत आणखी ५ सामने खेळणार आहे. टीम इंडियाचा या स्पर्धेतील दुसरा सामना सोमवारी १३ जानेवारी रोजी होणार आहे. टीम इंडिया दुसऱ्या सामन्यात इंग्लंडविरुद्ध भिडणार आहे.

# 'एखादा गुन्हेगार व्हिडिओ करून शरण येतो म्हणजे तो यंत्रणेवर उपकार करतो का?-अमोल कोल्हे

मुंबई, (वृत्तसेवा):- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी बीड सरपंच हत्या प्रकरणावरुन संशियत आरोपी वाल्मिक कराड यांच्यावर टीका केली आहे. त्यांनी शिवसेना नेते विजय शिवतारे यांच्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना वाल्मिक कराड यांच्यावर निशाणा साधला. ''विजय शिवतारे यांना राज्याच्या गृहमंत्र्यांविषयी काही म्हणायचे नाही का? फक्त अजितदादांच्या पक्षातील एका नेत्याचे नाव येत तोपर्यंत इथे विषय थांबत नाही. मात्र एखादा गुन्हेगार व्हिडिओ करून शरण येतो म्हणजे तो यंत्रणेवर उपकार करतो का? यामध्ये गृह मंत्रालयाचे अपयश नाहीये का? सोयीने आरोप करण्यापेक्षा या घटनेचे मुळ पाहिलं पाहिजे. ही एक हत्या आहे. मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे. यामध्ये कोणतंही राजकारण आणायला नको'', असं अमोल कोल्हे म्हणाले. ''बीडमधील प्रकरणात या आरोपींना कोणी राजकीय व्यक्ती जर पाठिंबा देत असेल त्यासाठी कठोर भूमिका घेतली पाहिजे. त्यातच बीड जिल्ह्यातील राजकारण्यांनी सुद्धा आत्मचिंतन करण्याची गरज आहे. धनंजय मुंडे यांचे नाव जर सातत्याने समोर येत असेल तर त्यांनी नैतिकतेने राजीनामा देणे गरजेचे आहे. मात्र, राजीनामा न देता या गोष्टी अशाच पुढ नेल्या जात असल्याने कोणाला पाठीशी घातलं जातोय का? ही शंका येत आहे'', असं अमोल कोल्हे म्हणाले. अमोल कोल्हे यांनी आशिष शेलार यांच्याही टीकेला प्रत्युत्तर दिलं. ''आशिष शेलार यांना विसर पडला असेल की पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पवारांचं कौतुक केलं आहे. भाजपच्या सरकारने कृषी क्षेत्राच्या योगदानासाठी शरद पवार यांना देशातील सर्वोच्च पुरस्कार देवून कौतुक केले'', असं अमोल कोल्हे म्हणाले. ''उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मंत्री धनंजय मुंडे यांचं नाव आले तर राजीनामा घ्यावाच लागणार. यामधे नैतिकता येतच नाही. चौकशी निष्पक्ष व्हावी. यासाठी दिलेला राजीनामा हा नैतिकतेचा राजीनामा असतो.

# काळजी घ्या! राज्यातील थंडीचा जोर पुन्हा वाढणार, हवामान विभागाने दिला अलर्ट

मुंबई, (वृत्तसेवा):- संपूर्ण राज्यामध्ये १३ जानेवारी रोजी सामान्यतः कोरडं हवामान पाहायला मिळणार आहे. तर काही शहरांमध्ये दुपारनंतर ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. राज्यामध्ये मागील दोन दिवसांपासून ढगाळ हवामान पाहायला मिळत असून थंडीची तीव्रता काहीशी कमी झाली आहे. आता मात्र संपूर्ण राज्यामध्ये पुन्हा एकदा स्वच्छ सूर्यप्रकाश आणि निरभ्र आकाश पाहायला मिळणार असून पुन्हा एकदा थंडीचा जोर वाढण्यास सुरवात होणार आहे. पाहुयात १३ जानेवारी रोजी राज्यातील हवामान कसे असेल. मुंबई शहर आणि उपनगरात सामान्यतः निरभ्र आकाश राहील तर मुंबईतील कमाल तापमान तेही ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १७ अंश सेल्सिअस राहील. मुंबईतील कमाल आणि किमान तापमानामध्ये पुढील काही दिवसांमध्ये चढ-उतार पाहायला मिळणार आहेत. राज्यातील आणखी एक प्रमुख शहर असलेल्या पुणे शहरांमध्ये सकाळच्या वेळी धुके तर त्यानंतर अंशतः ढगाळ आकाश राहण्याची शक्यता आहे. पुण्यातील कमाल तापमान २८ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १३ अंश सेल्सिअस एवढे राहील. मराठवाड्यातील प्रमुख शहर असलेल्या छत्रपती संभाजीनगमध्ये दुपारनंतर अंशतः ढगाळ आकाश राहील. तर कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस तर किमान तापमान १३ अंश सेल्सिअस एवढे राहण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रातील प्रमुख शहर असलेल्या नाशिकमध्ये सामान्यतः निरभ्र आकाश राहील. नाशिकमधील कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस तर किमान तापमान १२ अंश सेल्सिअस एवढे राहण्याची शक्यता आहे. नाशिकमध्ये थंडीचा जोर पाहायला मिळू शकतो. राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरमध्ये धुक्यासह ढगाळ आकाश राहील.

## पान १ वरून

### क्षीरसागर-मुंडेकडून...

सुरक्षेचा मुद्दा पुढे केला. यातून तत्कालीन नेत्यांना या भागातील लोकात काय चोर दिसले का असा सवाल देखील समोर अनेकांनी आणला मात्र तिकडे आपणच जमिनी घेऊन ठेवल्या आणि भाव वाढवून रेल्वेवर दरोडा टाकून काही निवडक लोकांनी कोट्यावधी रुपये लुटण्याचा कार्यक्रम लावला. यातून रेल्वे तिजोरी आणि प्रवासी खिशा दोन्हीकडे दरोडा टाकण्यात आला नाही का. तत्कालीन पालकमंत्री जयदत्त क्षीरसागर आणि गोपीनाथ मुंडे यांनी सदरील रेल्वेस्टेशन पालवणकडे नेण्यास हातभार लावल्याचे बोलले जात आहे.

### सरपंचाच्या मृत्यूने...

घातपाताचा संशय व्यक्त होतं होता. मात्र क्षीरसागर यांचे कोणाशीही वैर नव्हते सर्वांशी मिळून मिसळून वागणारे सरपंच होते. त्यामुळे यात कुठलाही यात घातपात झाल्याचा कुठलाही संशय आम्हाला नसल्याचे देखील ग्रामस्थ व नातेवाईकांनी स्पष्ट सांगितले आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र आरोपी अद्याप ताब्यात घेतला असून आता याच्या चालकाचा शोध सुरू असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### १ ते ९ फेब्रुवारी चंपावती...

महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे पोस्टर विमोचन काल दि. १२ जानेवारी २०२४ रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यादरम्यान चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे मार्गदर्शक शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांचा आभारपूर्वक सत्कार केला. पोस्टर विमोचनाच्या कार्यक्रमानंतर महोत्सवाची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत बीड शिवसेनेच्या तिन्ही जिल्हाप्रमुखांनी मिळून महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. याबरोबरच जिल्ह्यातून येणाऱ्या सर्व बाल कलाकारांची गैरसोय होऊ नये यासाठी सूचना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बीड शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक यांच्यासह चंपावती महोत्सवाचे व्यवस्थापक कलावंत लक्ष्मीकांत दोडके व अनिकेत कांबळे उपस्थित होते. यावर्षी चंपावती महोत्सवामध्ये समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, फॅमिली नृत्य, एकपात्री अभिनय, समूह गीत गायन, वैयक्तिक गीत गायन, चित्रकला, रांगोळी आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या सर्व स्पर्धा इयत्ता पाहिली ते तिसरी, इयत्ता चौथी ते सहावी आणि इयत्ता सातवी ते दहावी या वयोगटात होणार असून प्रत्येक स्पर्धा प्रकरातील प्रत्येक वयोगटात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ तीन पारितोषिके काढण्यात येणार आहेत. विजेत्या स्पर्धकांना शिल्ड आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत तर सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या महोत्सवात जी शाळा बक्षीसांची सर्वोच्च संख्या प्राप्त करेल त्या शाळेस मान्यवरांच्या उपस्थितीत बीड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडक बहाल करण्यात येणार आहे. याबरोबरच उत्कृष्ट नृत्य शिक्षक, उत्कृष्ट संगीत शिक्षक, उत्कृष्ट चित्रकला शिक्षक, उत्कृष्ट नाट्य शिक्षक, उत्कृष्ट प्राचार्य तथा उत्कृष्ट उपक्रमशील शिक्षक अशी विशेष पारितोषिक देण्यात येणार आहेत. बीडच्या कलाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलाकारांना चंपावती सन्मान या पुरस्काराचे देखील वितरण करण्यात येणार असल्याची माहिती चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली आहे.

### वाल्मिक कराडवर...

ठेवले जात आहे..मी स्वतः टॉवरवर चढून आंदोलन करणार आहे. टॉवरवर चढून मी स्वतःला संपवून घेणार आहे. मला या सगळ्यापासून भीती आहे. खंडणीतल्या आरोपीला वेगळी आणि खुनाच्या प्रकरणातील आरोपींवर वेगळी कारवाई केली जात आहे. यंत्रणा आम्हाला माहिती देत नाही, मुख्यमंत्र्याला भेटून मी मागणी केली होती पण तरी यंत्रणा आम्हाला तपासाची माहिती देत नाही. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात तपास यंत्रणेने आतापर्यंत आठ आरोपींना अटक केली. तसेच मोक्का अंतर्गत कारवाई केली. मात्र यात खंडणीतील आरोपी वाल्मीक कराड याच्यावर मोक्काची कारवाई केली जावी तसेच ३०२ च्या गुन्ह्यात आरोपी करावं या मागणीसाठी मसाजोग ग्रामस्थांचे मोबाईल टॉवर वर चढून आंदोलन केले जाणार आहे.

### त्या लाडक्या बहिणींचे...

बँकेंच्या खात्यात वेगळं नाव आहे, अशा महिलांबाबत तक्रार आली तर त्यांच्या अर्जाची पुन्हा पडताळणी करण्यात येईल, मात्र जीआरमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. परंतु आज राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी लाडकी बहीण योजनेवर दिलेल्या प्रतिक्रियेनंतर ज्या महिला या योजनेच्या लाभासाठी पात्र नाही अशा महिलांकडून दंडासहित पैसे वसूल केले जाणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. ✻ नेमकं काय म्हणाले भुजबळ? : गरीबांना या योजनेचा लाभ झाला पाहिजे हाच या योजनेचा उद्देश आहे. मात्र हेही खरं आहे, या योजनेचे काही नियम आहेत. ज्यामध्ये एका घरात दोन महिलांना पैसे देता येत नाहीत, मोटार गाडी असेल तर त्यांना पैसे देता येणार नाहीत. गरीबांना त्याचा लाभ झाला पाहिजे हा या योजनेचा उद्देश आहे. ज्या महिला नियमात बसत नाहीत, त्यांनी स्वतःहून आपली नावे काढली पाहिजेत. जे पैसे दिले गेले आता ते परत मागण्यात काही अर्थ नाही ते आता मागण्यात येवू नयेत, याच्यापुढे लोकांना सांगावं, जे नियमात नाही त्यांनी स्वतःहून नावे काढून घ्यावेत. त्यांनी जर तसं नाही केलं तर मग मात्र दंडासह पैशांची वसुली करावी, असं भुजबळ यांनी म्हटलं आहे.

### पियांका मीन्स...

तीन दिवसात करणारे काही पत्रकारांनी जिल्हा म्हणजे महाराष्ट्राचा टून्द्रा प्रदेश करून टाकला, अवघ्या प. महाराष्ट्राचा ऊस तोडण्यात आमच्या पिढ्या खपल्या. मात्र बीडला मुख्य प्रवाहात येउच द्यायचे नाही यासाठी मुंबई आणि मुंबईच्या मांडीवर काखेत आणि पायात बसलेले लोक अहोरात्र लाळ जाळीत आहेत. बीड कसा बदमाशांचा जिल्हा आहे हे दाखवण्यात मुंबईच्या मिडीयाने कसर सोडली नाही. बीडच्या प्रियांका इंगळे या लेकीने देशाच्या खो-खो संघाचे कर्णधारपद मिळवले, यावर विलासी पत्रकारांची एखादी रील आली का कारण लेकीच्या कौतुकाचे शो केल्यावर त्यांचा मालक तुकडा टाकणार नाही. दूरदर्शनचा गोल फिरायचा आमच्या आकाश गंगेसारखा त्या काळातल्या बातम्या म्हणजे जणू गाई बातम्या सांगत आहेत. आता मात्र टीआरपीसाठी ब्रेकिंग न्यूज साठी जि कुत्तरवड चालूय त्यात आमच्या बीडची मात्र छबी बिहार चंबळ सारखी होऊन बसली आहे. बीड मध्येच गुंड मुंबईत सगळे संतच राहतात, गुंडांच्या पैशावर चालणाऱ्या वृत्त वाहिन्या क्राईम बद्दल बीडला ज्ञान पाजळताना शब्दबद्ध झाल्या. आम्ही देशाचे कर्णधार बीड जिल्ह्याच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला आहे. खो-खो विश्वकप स्पर्धेत भारतीय संघाच्या कर्णधारपदी बीडच्या प्रियंका इंगळेची निवड करण्यात आली आहे. प्रियंका बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील कळंब अंबा गावची आहे. ती नुकतीच पुण्यात क्रीडा अधिकारीपदावर रुजू झाली आहे. भारतीय संघाच्या कर्णधारपदी निवड झाल्याने प्रियंकाचे सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र मुंबईच्या पत्रकाराना बीडच्या लेकीचे तेवढे कौतुक दिसेना. टीआरपीचे रक्त पिताना जि ब्रेकिंग दिसते आहे यातून समाज व्यवस्था बिघडून टाकायला हाच मिडीया जबाबदार नाही का? लोक पत्रकार म्हटले कि कुणाचा विचारतात ,पत्रकारांच्या विश्वास हर्ततावर आता लोक उघड दचाडे देत आहेत.

### मिडीयामुळे आनंदग्रामचा...

वरून एक दाता देखील इमारत द्यायला तयार झाला. मात्र मिडीयाने सकाळ, संध्याकाळ, दुपार जि प्रतिमा तयार केली. सदरील दात्याने फोन करून कळवले कि आपण बीडला मदत करणार नाही. उद्या अनेकांचे जीव वाचवणारा हा दवाखाना केवळ मिडीयाच्या भयानक भीतीवह बातम्यांनी दुरावला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com



जिजाऊ माँ साहेब यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करतांना ॲड. गोविंद शिराळे, सचिन उबाळे,



नागपूर येथ नेत्या तथा भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय सचिव नामदार लोकनेत्या श्रीमती पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल विडा गटाचे जिल्हा परिषद सदस्य विजयकांत (भैय्या) मुंडे यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या प्रसंगी जि.प.सदस्य भारत (बप्पा) काळे,किरण बिक्कड आदी.

# प्रलंबित कामे जलदगतीने पूर्ण करा

## जनतेच्या कामांना प्राधान्यक्रम द्या,मतदार संघात नवनवीन योजना राबविण्यासाठी अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवा : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षांपासून आष्टी मतदार संघात प्रशासकीय यंत्रणेचा सुरू असलेला अनागोंदी कारभार माझ्या काळात मी खपवून घेणार नाही.तसेच मतदार संघातील रखडलेले प्रकल्प जलदगतीने पूर्ण कसे होतील यासह सर्वसामान्य जनतेच्या कामांना प्राधान्यक्रमाने सोडवून मतदार संघात नवनवीन योजना राबविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तत्परता दाखवून विकास कामांना गती देण्याची गरज असल्याचे मत आ.सुरेश धस यांनी व्यक्त केले.

शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता आष्टी पंचायत समिती कार्यालय सभागृहात बीडचे जिल्हाधिकारी



अविनाशजी पाठक यांच्या प्रमुख उपस्थितीत आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील कृषी व पाटबंधारे विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत , प्रलंबित खुंटेफळ साठवण तलाव योजने संदर्भात जलद गतीने पावले उचलून कामास गती देणे.वन विभागाच्या क्षेत्रावर असलेल्या ग्लिरिसिडीया या वनस्पतीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे विदारक चित्र समोर येत असून त्या ऐवजी वड, पिंपळ आदी वृक्षांची लागवड मनरेगाच्या माध्यमातून प्राधान्यक्रमाने करणे,सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढविणे,सुरत चेन्नई या महामार्गासाठी आष्टी मतदार संघातून जात असलेल्या राष्ट्रीय मार्ग-४६ रस्त्याबाबत जमीन अधिग्रहण करणे,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी एसटी महामंडळाच्या फेऱ्या वाढवणे तसेच मच्छिंद्रनाथ गडावर मुक्कामी बस सुरू करणे, पिंपळा लोणी मार्गे अहमदनगर ही बस सुविधा यासह महिंदा, मोराळा, पाटसरा यासह ग्रामीण भागातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी बस सेवा उपलब्ध करून देणे,जिल्हा परिषद,अंतर्गत कार्यरत शिक्षण विभाग, ग्रामसेवक, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय दवाखाना येथे अधिकारी कर्मचारी यांची प्रमाणित बिंदूनामावली तपासणे,जिल्हापरिषद शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे, प्राथमिक पदवीधर, विस्तार अधिकारी मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करणे,काही ग्राम पंचायत मध्ये सरपंच, ग्रामसेवक यांना विचारात न घेता बोगस सह्या करून पैसे उचलले आहेत त्यांच्यावर तत्काळ कार्यवाही करणे, सावरगांव परिसर अविकसित क्षेत्र घोषित जिल्हा परिषद लघुपाटबंधारे,जलसंधारण विभाग गावतलाव, पाझर तलाव दुरुस्ती करणे,वीज वितरण विभागाच्या टाकळी (अ)- अतिक्रमण नवीन सबस्टेशन, सोलार पंप, अतिरिक्त होणाऱ्या विद्युतदाबा बाबत निर्णय घेणे. शिराळ आणि महिंदा- येथील उपकेंद्रासाठी जागा खरेदी करणे, मोराळा येथील ४२ एकर जागेचा विचार करणे, आष्टी, पाटोदा, शिरूर (का) येथील नवीन बस स्थानक कामांचा वेग वाढवणे

# तालूका खरेदी विक्री संघाची सोयाबीन चाळणी मशिन बसवल्याने शुक्रवार पासून खरेदी सुरू होणार: चाळणीचे पुजन करून घेतली चाचणी

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर तालूका खरेदी विक्री सघ़ाचे वतीने नाफेड मार्फत सोयाबीन खरेदी सुरू केली असून हि खरदी चाग़ल्या दर्जाचे सोयाबीनची व्हावी या साठी सोयाबीन चाळणी घेऊन खरदी सुरू करत असून एम आय डीसी भागात खरेदी केंद्र सुरू केले असून या चाळणीचे पुजन करून तीचे प्रात्यक्षीक घेण्यात आले शुक्रवार दि १०जानेवारी पासून नोद्णी केलेल्या शेतक-



याची खरेदी सुरू करण्यात येत असल्याचे खरेदी विक्री सघ़ाचे वतीने साग़ण्यात आले आहे. धारूर तालूका खरेदी विक्री सघ़ा कडून नाफेड ची सोयाबीन खरेदी केद्र सुरू करण्यात आले असून ४८९२ रुपये प्रती क्विंटलभाव असून १७०० पेक्षा जास्त शेतक-यानी नोद्द केली असून तालूका खरेदी विक्री संघाचे वतीने खरेदी सुरू करण्यात आला होती माञ खरेदी केलेला माल नाफ ेड दर्जा मुळे परत करत असल्याने चाग़ल्या प्रतीचे सोयाबीन खरेदी करून शेतक-याचा फायदा व्हावा या साठी सोयाबीन चाळणी खरेदी करण्यात आली असून प्रशासक ऋषीकेश काथळे याऩी पुढाकार घेऊन हे केले किसान सभेने खरेदी साठी पाठपूरावा केला धारूर एम आय डी सी मध्ये चाळणी सुरू करून प्रात्यक्षीक घेण्यात आले शुक्रवार दि १०जानैवारी पासून नियमीत सोयाबीन खरेदी सुरू करण्यात येत आहे हे चाळणी चे प्रात्यक्षीक घेताना किसान सभेचे तालुका सचिव दादासाहेब सिरसट कॉम्रेड मधुकर चव्हाण अंकुश घुगेज्ञखरेदी विक्री संघाचे सचिव सचिन चोले कर्मचारी भारत चव्हाणसह कर्मचारी उपस्थीत होते. सोयाबीन खरेदी आता नियमीत करण्यात येणार आहे.



गौराई पत्रकारसंघ यांनी उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार साप्ताहिक श्रेयसराज संपादक शिवनाथ काळे यांना ह.भ. तुळशीराम आतकरे महाराज यांच्या हस्ते दिला यावेळी संघाचे अध्यक्ष , तसेच सामाजिक कार्यकर्ते सुनील ठोसर तसेच संघातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# समता परिषदेची गाव तेथे शाखा, घर तेथे समता सैनिक अभियान राबवणार : ॲड. सुभाष राऊत



**माजलगाव । प्रतिनिधी**

येणाऱ्या काळात समता परिषदेची गाव तेथे शाखा घर तेथे समता सैनिक अभियान समता परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष आ. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार असून समता सैनिकांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीच्या तयारीला लागावे असे आवाहन समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

जालना शहरातील संत सावता महाराज भवन येथे जालना जिल्ह्यातील पदाधिकारी व समता सैनिकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी मार्गदर्शन करताना ॲड. सुभाष राऊत बोलत होते. या बैठकीला समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत, जालना जिल्हाध्यक्ष प्रा.मधुकर झरेकर, युवक अध्यक्ष विशाल धानोरे, शहराध्यक्ष दिपक वैद्य, तोडतले मामा, रवि उकर्डे यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. सुभाष राऊत पुढे म्हणाले की, छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज समता परिषद मराठवाडा नव्हे तर महाराष्ट्र आणि भारतात पोहोचली आहे. सर्वत्र समता परिषदेचे पदाधिकारी मोठ्या जोमाने कार्य करीत आहेत. जालना जिल्ह्यात देखील ओबीसी समाज मोठ्या संख्येने आहे. बैठकीस जालना जिल्ह्यातील समता परिषदेचे पदाधिकारी व समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देवगाव ग्रामपंचायत कार्यालयामध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

संपूर्ण मानव जातीला प्रज्ञा शील करुणेची शिकवण देणारे तथागत भगवान बुद्ध वारकरी संप्रदायाचा पाया ज्यांनी रचला ते ज्ञानेश्वर महाराज इतिहासाची पान आम्ही जेव्हा चाळत जातो तेव्हा महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पानापानात एक नाव आदराने घेतल्या जातं. ते म्हणजे राष्ट्रमाता जिजाऊसाहेब. शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवराय, शंभू राजे.. राजर्षी शाहू महाराज. देशाच संविधान लिहत असताना ज्याच्या डोळ्यासमोर छत्रपतीच स्वराज्य होतं ते घटनाकार डॉ.



बाबासाहेब आंबेडकर या सर्व महापुरुषांना सर्वप्रथम विन्रम अभिवादन. १२ जानेवारी महाराष्ट्राच्या इतिहासातला सर्वात सुंदर दिवस जिजाऊ आईसाहेब यांच्या जन्मापासून १२जानेवारी १५९८ मध्ये सिंदखेड राजा जिल्हा बुलढाणा याठिकाणी जन्मलेल्या जिजाऊ माँसाहेब महाराष्ट्र माता ठरल्या त्यांनी इथल्या मराठी माणसाच्या रक्तात स्वाभिमान जागा केला. आणि शून्यातून स्वराज्य निर्माण करण्यासाठी शिवराय घडवले.. शिवाजी महाराजाच्या गुरु, मार्गदर्शक आणि आईसाहेब जिजाऊ सर्वाना वंदनीय आहे. त्या लखूजी जाधव व म्हाळसाबाई जाधव यांची कन्या होत्या. पुढे जिजाऊचा विवाह शूर मराठी सरदार राजे शहाजी भोसले सोबत झाला. आणि नंतर त्यांना शिवाजी आणि संभाजी आणि यंकोजी हे ३ पराक्रमी मुलं झाली. त्यामध्ये सर्वात कर्तबगार छत्रपती शिवराय होते, लहानपपणापासून आऊसाहेब शिवाजी महाराजाना राम, कृष्ण यांच्या गोष्टी सांगितल्या आणि त्याच्या मनात स्वराज्याच बीज पेरलं

# सौ के एस के काकु कृषी महाविद्यालय मध्ये कॅम्पस मुलाखतीचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

सौ. के एस के काकू कृषी महाविद्यालय बीड या ठिकाणी वेटरीना हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने शेवटच्या वर्षांमध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कॅम्पसचे मुलाखतीचे आयोजन केले होते. ही कंपनी पशु आहार क्षेत्रामध्ये गरजेप्रमाणे आहारपूरक घटक बनवते, शेतकऱ्याना दुग्ध व्यवसाय फायदेशीर मार्गदर्शन करते तसेच वेटझोनच्या माध्यमातून, उत्पादने शेतकऱ्यांच्या दारात पोचवते. वेटरीना हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने व्हेटर्नरी सेल्स ऑफिसर या पदासाठी महाविद्यालयांमध्ये दिनांक ०९/०१/२०२५, गुरुवार रोजी मुलाखतीचे आयोजन केले होते. शेवटच्या वर्षातील २९ विद्यार्थी या मुलाखतीसाठी उपस्थित होते. कंपनीच्या वतीने श्री अमित शिंदे, नॅशनल सेल्स ऑफिसर आणि श्री युवराज खरात, झोनल सेल्स ऑफिसर यांनी या मुलाखती घेतल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना लवकरच कंपनीच्या वतीने नियुक्तीपत्र दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांना करिअरची संधी उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थी व पालक यांनी समाधान व्यक्त केले.

# गितांजली वानखडे यांना आदर्श शिक्षक पुरस्कारा पाठोपाठ आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी येथील निर्भिड पत्रकार तथा इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका श्रीमती गितांजली लव्हाळे वानखडे मॅडम यांना नुकताच राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला होता. त्या पाठोपाठ त्यांना मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झाला आहे. सदर पुरस्कार १२ जानेवारी रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात येणार



आहे. एकाच आठवड्यात दोन-दोन पुरस्कार जाहीर झाल्यामुळे सध्या त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिवाय वडवणी शहरातील अनेक मान्यवरांसह विविध संस्थांनी त्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या बाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यासह जिल्ह्यात एक निर्भिड महिला पत्रकार म्हणून गितांजली लव्हाळे वानखडे मॅडम काम करत आहेत.

वडवणी तालुक्यामध्ये खमक्या जिगरबाज डॅशिंग महिला पत्रकार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. तसेच त्या इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून अध्यापनाचे ही काम करत आहेत.

# तलाठी काजल ससाणे यांनी दिली नागापूर बुद्रुक येथे पिकपाहणी व इतर कामासाठी भेट

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या आदेशानुसार तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या सूचनेनुसार अतिवृष्टी २०२४ मध्ये झालेल्या नुकसान भरपाईचे अनुदानबाबत प्रक्रिया सुरु असून त्यासाठी आवश्यक ती माहिती भरून घेण्यासाठी मौजे नागापूर बुद्रुक येथे



ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे यांनी गावातील खातेदारांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करून त्यांना विश्वासात घेऊन सर्व प्रकारची माहिती दिली . शेतकऱ्यांची यादी संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर शेतकऱ्यांना विशिष्ट क्रमांक म्हणजे व्हि के नंबर प्राप्त होतो .





# राज्यस्तरीय ड्रेस डिझाईनिंग स्पर्धा संपन्न

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या महाविद्यालयाचा नाविन्यपूर्ण उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, संत ज्ञानेश्वर नगर, बीडच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या व राजमाता मासाहेब जिजाऊ यांच्या जयंती निमित्ताने ३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करून या आदर्श मातांना अभिवादन करण्यात आले. या उपक्रमा अंतर्गत शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ रोजी बीड शहरातील धानोरा रोड येथील राजयोग मंगल कार्यालय येथे महाविद्यालयाच्या वतीने राज्यस्तरीय ड्रेस डिझाईनिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष, तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष, मा. प्रा. प्रदीप रोडे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक मा. श्रीमती भिवरासिंग नरेंद्रसिंग साळुंके (फॅशन डिझायनर, शिल्पकार, चित्रकार,छ. संभाजीनगर.), कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. यशवंत कांबळे (प्रसिद्ध उद्योजक, पुणे.) मा. महेश साळुंके ( वास्तुतज्ञ, छ. संभाजीनगर.), तर प्रमुख उपस्थिती मध्ये मा. राम गायकवाड, प्राचार्य डॉ. अशोक धुलधुले( तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड.) उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमास परीक्षक म्हणून मा. प्रज्ञा जमधाडे ( लॅक्मे- प्रसिद्ध मेकअप आर्टिस्ट), मा. जेधे सर ( प्रसिद्ध डिझायनर), यांची उपस्थिती लाभली. यावेळी स्पर्धेत सहभाग म्हणून बीड, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, पुणे मुंबई, ठाणे, यवतमाळ, जळगाव, अहमदनगर, नाशिक, नांदेड आदि जिल्ह्यातील १३० विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग नोंदवला तर कार्यक्रमासाठी खास आवर्जून आपल्या पाल्यांचे कलाकृतीतील कौतुक पाहण्यास पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनींनी व डिझाईनर यांनी डिझाईन केलेले डिझाईनिंग ड्रेस मॉडेल्स यांना परिधान करून प्रदर्शित करण्यात आले. यावेळी राज्यातील १३ महाविद्यालय व ८ प्रसिद्ध बुटिक मधील डिझायनर सह अन्य डिझायनर यांनीही हिरारीने सहभाग नोंदविला. स्पर्धेच्या वेळी एकूण फर्स्ट राऊंड, सेमी फायनल व फायनल असे राऊंड घेण्यात आले.

# ठरलं ! दि.१ ते ९ फेब्रुवारी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा



## शिवसेना जिल्हाप्रमुख जगताप, मुळूक, गलधर यांच्या हस्ते चंपावती महोत्सवाचे पोस्टर विमोचन!

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रातील मानबिंदू ठरलेला चंपावती महोत्सव बाल कलाकारांनी आपल्या अद्भुत कलाविष्काराने एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवला आहे. गत दोन वर्षांच्या अफाट यशानंतर जिल्ह्याभरातील अनेक शाळांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, पालक बालकलाकार आणि कलाप्रेमींच्या खास आग्रहास्तव याहिवर्षी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १ फेब्रुवारी २०२४ ते दि. ८ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान आठ दिवासीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे पोस्टर विमोचन काल दि. १२ जानेवारी २०२४ रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यादरम्यान चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे मार्गदर्शक शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांचा आभारपूर्वक सत्कार केला. पोस्टर विमोचनाच्या कार्यक्रमानंतर महोत्सवाची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत बीड शिवसेनेच्या तिन्ही जिल्हाप्रमुखांनी मिळून महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. याबरोबरच जिल्ह्यातून येणाऱ्या सर्व बाल कलाकारांची गैरसोय होऊ नये यासाठी सूचना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बीड शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक यांच्यासह चंपावती महोत्सवाचे व्यवस्थापक कलावंत लक्ष्मीकांत दोडके व अनिकेत कांबळे उपस्थित होते.

## जिद्द आणि चिकाटीच्या जीवावर सख्खे बहिण भाऊ झाले सी. ए.

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील एक छोट्याशा बऱ्हाणपूर गावातील खेडेगावात प्राथमिक शिक्षण पूर्ण करून देशातील कठीण परीक्षा असणारी पहिल्याच प्रयत्नात यशस्वी करणारी भगवती अशोक क्षीरसागर व भाऊ अरविंद अशोक क्षीरसागर पहिल्याच प्रयत्नात जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर



आपल्या आई-वडिलांचे व आजी-आजोबांचे स्वप्नपूर्ती करण्यासाठी सीए झाले त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या आई वडिलांचेही बऱ्हाणपूरचे सरपंच गणेश लांडे, सिद्धेश्वर क्षीरसागर व बीभीषण क्षीरसागर बऱ्हाणपूर गाव वाशी या तर्फे अभिनंदन करण्यात आले तसेच दोघा बहिण भावाने मिळवलेल्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## धनंजय गुंदेकर यांचा यशस्वी पाठपुरावा ; रखडलेले ट्रेनी शिक्षकांचे वेतन मिळाले

## गुंदेकर यांच्या सहकार्याने कार्यकाळ वाढीसाठी लढा उभारणार : विठ्ठल नांदे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील ४२७ ट्रेनी शिक्षकांचे (मुख्यमंत्री कौशल्य विकास योजना) मानधन रखडले होते. यासाठी धनंजय गुंदेकर यांच्या नेतृत्त्वाखाली पाठपुरावा गेल्या महिन्यापासून चालू होता. यासंदर्भात धनंजय गुंदेकर यांच्या विनंती वरून आ सुरेश धस यांनी देखील लक्ष घालत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट देखील विद्यार्थ्यांसह घेतली होती.

या मागणीस न्याय मिळाला असून काल बहुतांश ट्रेनी शिक्षकांचे मानधन खात्यावर जमा होण्यास सुरूवात झाली आहे. या सबंधी पाठपुरावा केल्याबद्दल संचालक धनंजय



गुंदेकर यांचे आभार तालुक्यातील सर्व ४२७ ट्रेनी शिक्षकांनी मानले आहेत. यासोबतच येत्या काळात कार्यकाळ वाढवावा यासाठी गुंदेकर यांच्या सहकार्याने लढा उभारणार असल्याचे मुख्यमंत्री कौशल्य विकास संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल नांदे पाटील यांनी म्हंटले आहे.

## जायकवाडीच्या पाण्यासाठी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊ: आ. धस

### लोकलढा आंदोलनातील शेतकऱ्यांनी घेतली आमदार धस यांची भेट



**लोकप्रतिनिधींची घेणार भेट**

**शिरूर ते माजलगाव या १०० किमी अंतराच्या सिंदफणा पट्ट्यात दरवर्षी पाणी प्रश्न उग्र स्वरूप धारण करतो. हा पाणी प्रश्न कायमचा सोडण्यासाठी बीड जिल्ह्यातील मंत्री, आमदार, खासदार अशा सर्व लोकप्रतिनिधींची भेट घेऊन त्यांना हा प्रश्न सोडवण्यासाठी साकडे घालणार असल्याचे यावेळी लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे म्हणाले. सिंदफणा पट्ट्यात बारमाही पाणी नसल्याने शेतकऱ्यांवर वाईट वेळ येत असल्याची परिस्थिती यावेळी बप्पासाहेब अण्णा तळेकर, बाबुरावजी जेठे यांनी व्यक्त केली.**

**बीड । प्रतिनिधी**

सिंदफणा नदीवर साखळी बंधारे होऊन पात्र बारमाही पाणीदार व्हावे यासह इतर मागण्यांसाठी लोकलढा आंदोलनातील शेतकऱ्यांनी आमदार सुरेश धस यांची भेट घेतली. शेतकऱ्यांचे पाणी प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊ असे यावेळी आमदार सुरेश धस शेतकऱ्यांना म्हणाले. यावेळी भाऊसाहेब जरांगे पाटील, जिल्हा परिषद सदस्य बाप्पासाहेब तळेकर, माजी सभापती बाबुरावजी जेठे, माजी नगराध्यक्ष बळीराम पोटे, आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, बालासाहेब शेरकर, गणेशराव जाधव, देविदास चव्हाण, शिवाजीराव चव्हाण, राजाभाऊ कुटे महाराज, दिपक जाधव, शामराव घुगे, राहुल लोंढे, राजेंद्र मोरे, रामेश्वर गाडे, महादेव रडे, शेख शफिक आदींसह शेतकरी उपस्थित होते. गेल्या अनेक दिवसापासून सिंदफणा काठच्या १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत जायकवाडीच्या पाण्यासाठी लोकलढा आंदोलन उभारले आहे. या आंदोलकांनी आमदार सुरेश धस यांची भेट घेत पाणी अभावी शेतकऱ्यांवर आत्महत्याची व गरिबी, बेरोजगारीत खितपत पडण्याची वेळ आल्याची कैफियत मांडली. सिंदफणाकाठच्या शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी बारा महिने पाणी उपलब्ध असणे गरजेचे आहे.

## पौर्णिमा निमित्त आज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शिवानंद महाराज यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थान येथे पौर्णिमा निमित्त काळेगाव हवेली गावकऱ्यांची पंगत असून हभप शिवानंद महाराज हनुमान टेकडी यांची कीर्तनसेवा असणार आहे. प्रत्येक पौर्णिमा निमित्त हभप शांतिब्रम्ह नवनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली कीर्तन सेवा व महापंगत असते. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थान येथे पंचक्रोशीतील भाविक भक्त येतात. या भाविक भक्तांना अध्यात्मिक अशा पर्वणीच आयोजन करण्यात येते. आज



दिनांक १३ जानेवारी रोजी हनुमान टेकडी येथील शिवानंद महाराज यांची कीर्तन सेवा असणार आहे. या अध्यात्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा असं आवाहन महंत श्री हभप नवनाथ बाबांनी केले आहे.

## शासकीय कापुस खरेदी पुढील आदेश येईपर्यंत बंद राहिल: सभापती जयदत्त नरवडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील बाजार समिती अंतर्गत असलेल्या शासकीय कापुस खरेदी केंद्रावर कापसाची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने तसेच ढगाळ वातावरणामुळे सिसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत कापुस खरेदी बंद राहणार असल्याने शेतक-यांनी कापुस विक्रीस आणु नये असे आवाहन सभापती जयदत्त नरवडे यांनी केले आहे.

येथील बाजार समिती अंतर्गत मनकॉट जिनिंग, पुर्वा जिनिंग, कुणाल जिनिंग, कॉटसिट जिनिंग,



एच. जे. कॉटन, महाराष्ट्र जिनिंग पात्रुड याठिकाणी शासकीय कापुस खरेदी केंद्रावर सिसीआयकडुन कापसाची मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे जिनिंगमध्ये कापुस ठेवण्यास जागा उपलब्ध नाही व वातावरणात झालेल्या बदलामुळे पावसाची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांचे नुकसान होउ नये याकरीता शेतकरी बांधवांनी दि. १२ जानेवारी पासुन ते सिसीआयचे पुढील आदेश येईपर्यंत शासकीय कापुस खरेदी बंद राहिल याची शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी तसेच पुढील आदेश येईपर्यंत शासकीय खरेदी केंद्रावर शेतकरी बांधवांनी कापुस विक्रीस आणु नये असे आवाहन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांनी केले आहे.



*शिवराय स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, गणेश वरेकर यांनी बीड शहरातील राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या अर्धाकृती पुतळ्याला विनम्र अभिवादन करतांना व जिजाऊ जन्मोत्सवानिमित सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, विनोद गुंड पाटील, दीपक घोडके पाटील, अजय आण्णा गायकवाड, मुकेशजी घुमरे, मनोज भैय्या डोंगरे सर्व उपस्थित होते.*

## सापा पासून दक्षता बाळगा मात्र त्याचा जिव घेऊ नका : सर्पमित्र निमेश चिद्रवार



**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील सर्पमित्र निमेश चिद्रवार यांनी ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष घोपस जातीचा पकडलेला विषारी साप दाखवत या भागा आढळणारे विषारी बिनविषारी सापाचे बद्दल मार्गदर्शन केले सापा बद्दल मनात भिती बाळगूनये साप दिसला तर तात्काळ सपर्क करा त्याचा जिव घेऊ नका असे अवाहण ही केले.

किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना सर्पमित्र निमेश चिद्रवार स यांनी प्रत्यक्ष त्यानी पकडलेला विषारी घोणस जातीचा साप दाखवत मार्गदर्शन. केले. यावेळी निमेश चिद्रवार स यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष साप दाखवला त्या सापाविषयी सविस्तर माहिती सांगत सापाचे प्रकार, विषारी - बिनविषारी साप, अंडे देणारे साप, पिलांना जन्म देणारे साप, परिसरातील साप यांच्या विषयी सखोल माहिती सांगत मार्गदर्शन केले सापांना पकडण्या साठी लागणारे साहित्य दाखवण्यात आले. तसेच वन्यजीवांना जीवनदान देण्याचे विद्यार्थ्यांना आव्हान केले. आता पर्यंत ९२सापाला आपण जिवनदान दिल्याचे सागीतले सापा पासून घ्यायचे काळजी बद्दल माहीती दिली यावेळी सर्पमित्र निमेशजी चिद्रवार , संचालक शैला महाजन , शेख एस एस , सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते

## चिंचवन येथे आज मकरध्वज जन्मोत्सव सोहळा

### रामायणाचार्य अर्जुन महाराज लाड यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार सांगता

**वडवणी । प्रतिनिधी**

भारत देशात हनुमान पुत्र म्हणून ओळखले जाणारे मकरध्वजाचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील वडवणी जवळ चिंचवन येथे आहे रामायण काळात मंकावती नगरी हीच आजची चिंचवण आहे याच ठिकाणी राम लक्ष्मणाला बंदिस्त करून ठेवले होते आणि याच ठिकाणावरून मकरध्वज हनुमंताचे युद्ध होऊन हनुमंताने त्यांची सोडवणूक केली होती रामायण काळातील या ठिकाणीच भव्य दिव्य मकरध्वज जन्मोत्सव सोहळा दरवर्षी साजरा होतो. आज या सांगत सोहळ्याची काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. चिंचवन येथील या सोहळ्या आतापर्यंत महाराष्ट्र राज्यातील नामवंत कीर्तनकाराची कीर्तने झाले आहेत गावातील सर्व नागरिक मोठ्या उत्साहात





या सोहळ्यामध्ये सहभागी झाले आहेत .पंगती झाले आहेत या सोहळ्यात आतापर्यंत या महाराजांची कीर्तने झाले आहेत या गावातील रहिवासी असलेले हभप पुरुषोत्तम महाराज कोठुळे यांच्या नियोजनातून हा सोहळा सर्व गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे यशस्वीपणे पार पडत आहे सकाळी दिवस सूर्योदय वेळी मकरध्वज जन्मोत्सव सोहळा साजरा होणार आहे.

## पौष पौर्णिमेनिमित्त चौंडेश्वरी मातेचा मिरवणूक सोहळा ; महाप्रसादाचे आयोजन



**वडवणी । प्रतिनिधी**

प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही अत्यंत कष्टाळू व प्रामाणिक असलेल्या कापड तयार करणारा कोष्टी समाजाची कुलस्वामिनी माता चौंडेश्वरी मातेचा पौष पौर्णिमेनिमित्त मोठा उत्सव सबंध देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने वडवणी येथे बहुसंख्य असलेल्या कोष्टी समाजाच्या वतीने प्रतिवर्षी विविध सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक उपक्रमांचे आयोजन करून हा सोहळा साजरा करण्यात येतो. या सोहळ्यासाठी वडवणी तालुक्याच्या बाहेरून देखील भाविक भक्त येत असतात. प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तन मंडळींचे दररोज कीर्तन होत आहे. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी आज माता चौंडेश्वरीची शोभायात्रा सकाळी ८:०० ते १०:०० काढण्यात येणार आहे. त्यानंतर १०:०० ते १२:०० रामायणाचार्य ह. भ. प. नामदेव महाराज लबडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे.

